ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स, व्ही.आय.पी.रोड, नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

• वर्ष २५ वे • अंक ४१ • बुधवार दि.४ नोव्हेंबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

गोकुळमध्ये चार शासननियुक्त संचालक नेमण्यास मंत्रिमंडळाची मंजुरी;आ.सतेज पाटलांना धक्का



मुंबई : कोल्हापूरच्या गोकुळ दूध संघावरून राज्यातील राजकीय वातावरण तापले आहे. आता राज्य सरकारने घेतलेल्या एका मोठ्या निर्णयामुळे गोकुळ दूध संघातील सत्ता समीकरणाची गणिते बदलणार आहेत. याचा मोठा झटका काँग्रेस नेते सतेज पाटील यांच्या समविचारी पॅनलला बसला आहे. कारण, आज बुधवारी (४ नोव्हेंबर) झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत गोकुळ दूध संघावर चार शासननियुक्त संचालकांची नियुक्ती करण्यास राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. विशेष म्हणजे या चारही संचालकांना मतदानाचा अधिकारही देण्यात येणार आहे.

कोल्हापूर जिल्ह्याचे राजकारण गोकुळ दूध संघाभोवती फिरते. त्यामुळे गोकुळची सत्ता मिळवण्यासाठी दोन्ही बाजूंनी जोरदार रस्सीखेच सुरू होती. अखेर १८ ऑक्टोबर रोजी गोकुळमधील २५ संचालकांसाठी निवडणूक झाली. १९ ऑक्टोबर रोजी झालेल्या मतमोजणीत सतेज पाटील यांच्या समविचारी पॅनेलने २५ पैकी १३ जागा जिंकून बहुमत मिळवले. मात्र, नव्या संचालकांची एकही बैठक होऊ शकली नाही. कारण कोरमसाठी १४ संचालकांची उपस्थिती गरजेची असते. त्यामुळे निकालानंतर एकही बैठक होऊ शकली नाही आणि पेच निर्माण झाला होता. विरोधातील १२ संचालकांनी बैठक टाळल्यामुळे समविचारी पॅनेलने मुंबई उच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठावले होते. त्यावर कोर्टाने अध्यक्षांची निवडीसाठी १० नोव्हेंबर रोजी सकाळी बैठक घेण्याचे निर्देश दिले होते. तत्पूर्वी मंत्रिमंडळाने राज्यातील ज्या सहकारी संघिक संस्थांची वार्षिक उलाढाल ५०० कोटींहून अधिक आहे, अशा संस्थांच्या समित्यांवर शासन नामनिर्देशित पाच सदस्यांची नियुक्ती करण्याचा निर्णय घेतला. एक सहाय्यक निबंधकाच्या दर्जापेक्षा कमी नसलेला अधिकारी आणि संस्थेच्या कार्याचा अनुभव असलेल्या चार व्यक्तींची नियुक्ती होणार. शासकीय अधिकाऱ्याला मताचा अधिकार नसेल. इतर चौघांना संचालक मंडळात मताचा अधिकार, पण ते संस्थेच्या पदाधिकारी पदाच्या निवडणुकीस पात्र राहणार नाहीत, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे सतेज पाटील यांच्या समविचारी पॅनेलला जबरदस्त झटका बसला आहे. बहुमत मिळवूनही त्यांच्या बहुमताला किंमत राहिली नाही. लोकशाही मार्गाने निवडणूक जिंकूनही हातातून सत्ता हिरावून घेण्याचा प्रकार आहे, अशी टीका सतेज ऊर्फ बंटी पाटील यांनी केली आहे. तत्पूर्वी दोन दिवसांपूर्वी त्यांनी गोकुळमधील या एकाधिकारशाहीविरोधात आवाज उठवण्यासाठी सर्व संपादकांना पत्र लिहून आवाहन केले होते.

मराठवाड्यातील २.७६ लाख शेतकऱ्यांना लाभ-मुख्यमंत्री

मुंबई/प्रतिनिधी-दुष्काळी परिस्थितीचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी राज्य सरकारने जाहीर केलेल्या



पाच हजार रुपयांच्या अग्रीम मदतीपैकी आतापर्यंत ७३ लाख शेतकऱ्यांच्या खात्यांत रक्कम जमा झाली आहे. येत्या दोन दिवसांत राज्यातील सुमारे ९५ टक्के शेतकऱ्यांपर्यंत ही मदत पोहोचेल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रिमंडळ बैठकीनंतर दिली.

राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर पत्रकारांशी संवाद साधतांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेअंतर्गत आणखी चार लाख ८६ हजार शेतकऱ्यांच्या खात्यांत चार हजार ७६४ कोटी रुपये जमा करण्यात आले आहेत. यामध्ये मराठवाड्यातील दोन लाख ७६ हजार शेतकऱ्यांचा समावेश आहे. आतापर्यंत या योजनेतून शेतकऱ्यांच्या खात्यांत सुमारे १९ हजार कोटी रुपये जमा केल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. महायुती सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे असल्याचा दावाही त्यांनी केला.दरम्यान,विरोधकांकडून महायुतीच्या पान ४ वर

दुष्काळग्रस्त भूमिहीन शेतमजुरांचा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला मोर्चा

नांदेड/प्रतिनिधी-दुष्काळाच्या संकटात होरपळणाऱ्या भूमिहीन शेतमजूर, गरीब शेतकरी, महिला श्रमिक आणि इतर ग्रामीण मजुरांच्या न्याय्य हक्कांसाठी महाराष्ट्र शेतमजूर व इतर ग्रामीण मजूर युनियन (लाल बावटा), जिल्हा समितीच्या वतीने बुधवारी नांदेडच्या जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य एल्गार मोर्चा काढण्यात आला. जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर भूमिहीन शेतमजुरांना तातडीने ३० हजार रुपये श्रमनुकसान भरपाई द्यावी यासह इतर विविध मागण्यासाठी हा मोर्चा काढण्यात आला.

शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापासून दुपारी या मोर्चाची सुरूवात झाली. जोरदार घोषणाबाजी करत मुख्य रस्त्याने हा मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला त्यानंतर आंदोलकांच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांना विविध मागण्याचे निवेदन दिले. प्रत्येक पात्र दुष्काळग्रस्त भूमिहीन शेतमजूर कुटुंबाला किमान ३० हजार रुपये श्रमनुकसान भरपाई द्यावी, भूमिहीन शेतमजूर व इतर ग्रामीण मजुरांसाठी स्वतंत्र 'भूमिहीन मजूर सन्मानधन योजना' सुरू करावी,



दुष्काळग्रस्त भागात रोजगार हमी योजनेची प्रभावी अंमलबजावणी करून मागणी करणाऱ्या मजुरांना तात्काळ काम द्यावे; काम न दिल्यास कायद्यानुसार बेरोजगारी भत्ता द्यावा, पीकनुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने भरपाई व पीकविम्याचा लाभ वितरित करावा, विद्यार्थ्यांचे चालू व पुढील वर्षाचे शैक्षणिक शुल्क पूर्णपणे माफ करून शिष्यवृत्ती व स्वाधार योजनेचे प्रलंबित लाभ तातडीने वितरित करावेत यासह तब्बल १२ मागण्याचे निवेदन देण्यात आले. दुष्काळामुळे शेतीतील कामे कमालीची कमी झाली आहेत. त्यामुळे रोजगाराचे दिवस बुडाले पान ४ वर

अमेरिकेच्या मध्यावधी निवडणुकीत ट्रम्प यांना धक्का;रिपब्लिकन पक्षाची पीछेहाट

नवी दिल्ली:अमेरिकेतील मध्यावधी निवडणुकीत अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षाला मोठा राजकीय धक्का बसला आहे. प्रतिनिधी सभा आणि सिनेट या दोन्ही सभागृहांमध्ये पक्षाचे बहुमत गेल्याने डेमोक्रॅटिक पक्षाचे वर्चस्व निर्माण झाले आहे. या निकालामुळे ट्रम्प यांच्या उर्वरित दोन वर्षांच्या कार्यकाळातील राजकीय अडचणी वाढणार असून, महत्त्वाचे निर्णय घेताना विरोधकांशी तडजोड करावी



लागण्याची शक्यता आहे.

३ नोव्हेंबर रोजी झालेल्या या निवडणुकीत डेमोक्रॅटिक पक्षाने दोन्ही सभागृहांत आघाडी घेतली. त्यामुळे ट्रम्प प्रशासनाच्या धोरणांना संसदेतील विरोधाचा सामना करावा लागू शकतो. सरकारी विधेयके, आर्थिक तरतुदी आणि संरक्षणविषयक निर्णयांमध्येही अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे.या निकालाचे पडसाद भारत-अमेरिका संबंधांवरही उमटू शकतात. विशेषतः व्यापार करार, संरक्षण सहकार्य आणि इंडो-पॅसिफिक क्षेत्रातील धोरणांवर त्याचा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मध्यावधी निवडणुकीतील हा निकाल ट्रम्प यांच्या नेतृत्वासाठी मोठा राजकीय इशारा मानला जात आहे.

पंतप्रधान मोदींकडून खा.पवारांची विचारपूस



मुंबई/प्रतिनिधी-पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ज्येष्ठ नेते शरद पवार यांना फोन करून त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. तुम्ही काळजी करू नका, सुप्रियाताई आणि आम्ही देश सांभाळू. तुम्ही आम्हाला आशीर्वाद देण्यासाठी ठणठणीत राहा, असे मोदी म्हणाल्याची माहिती पवारांचे निकटवर्तीय विठ्ठल मणियार यांनी दिली. या विधानामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

दरम्यान, पुण्यातील रुबी रुग्णालयात उपचार घेत असलेल्या शरद पवार यांना बुधवारी डिस्चार्ज देण्यात आला. डॉक्टरांनी त्यांना आठ दिवस विश्रांतीचा सल्ला दिला असून, ते मुंबईतील सिल्व्हर ओक निवासस्थानी रवाना झाले आहेत. मोदींच्या फोनमुळे पवारांच्या राजकीय भूमिकेबाबतही तर्कवितर्क सुरू झाले आहेत.

मनपा कंत्राटी कामगारांना दिवाळीपूर्वी वेतन व बोनस द्यावे

अन्यथा ६ नोव्हेंबरपासून बेमुदत आंदोलन;लाल बावटाचा इशारा

नांदेड/प्रतिनिधी-दिवाळीचा सण अवघ्या दोन-तीन दिवसांवर येऊन ठेपला असतानाही नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकेतील कंत्राटी सफाई कामगार आणि पाणीपुरवठा विभागातील कर्मचाऱ्यांना अद्याप वेतन व बोनस मिळालेला नाही. त्यामुळे संतप्त झालेल्या मराठवाडा नगरपालिका, महानगरपालिका कामगार-कर्मचारी युनियन (लालबावटा) संघटनेने आक्रमक भूमिका घेतली असून, दिवाळीपूर्वी वेतन व बोनस अदा करण्यासह प्रलंबित मागण्यांची तातडीने पूर्तता करावी, अन्यथा शुक्रवार, ६ नोव्हेंबरपासून महापालिका कार्यालयासमोर बेमुदत तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.

यासंदर्भात संघटनेचे कार्याध्यक्ष ॲड. कॉ. प्रदीप नागापूरकर यांनी महापालिका आयुक्तांना निवेदन दिले आहे. ६ फेब्रुवारी रोजी अतिरिक्त आयुक्तांसोबत झालेल्या बैठकीत कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांबाबत आश्वासन देण्यात आले होते. तसेच ५ फेब्रुवारी, २२ जुलै आणि ३० ऑक्टोबर २०२६ रोजी संघटनेच्या वतीने विविध मागण्यांसंदर्भात पत्रव्यवहार करण्यात आला होता. मात्र, अद्याप या मागण्यांवर कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. महापालिकेच्या आरोग्य व स्वच्छता विभागातील कंत्राटी सफाई कामगार तसेच पाणीपुरवठा विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना दिवाळीपूर्वी वेतन आणि बोनस देणे अपेक्षित असताना प्रशासनाने त्याकडे दुर्लक्ष केले आहे. सणासुदीच्या काळातही कामगारांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. वारंवार निवेदने देऊनही सकारात्मक प्रतिसाद मिळत नसल्याने संघटनेने आंदोलनाचा निर्णय घेतला आहे. दिवाळीपूर्वी वेतन व बोनस अदा करणे आणि यापूर्वी सादर केलेल्या निवेदनातील इतर प्रलंबित मागण्यांना तातडीने मंजुरी देऊन त्यांची अंमलबजावणी करावी, अशी मागणी संघटनेने केली आहे. पान ४ वर

आरोग्य सेवेत हलगर्जीपणा केल्यास कठोर कारवाई-डॉ.विजय कंदेवाड

बायोमेट्रिक हजेरी,औषधसाठा व रुग्णसेवेतील त्रुटी दूर करण्याचे सक्त निर्देश

नांदेड/प्रतिनिधी-सार्वजनिक आरोग्य विभागातील रुग्णसेवेचा दर्जा उंचावून नागरिकांना वेळेत दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. आरोग्य सेवेत हलगर्जीपणा, अनियमितता अथवा कर्तव्यात कसूर करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर शिस्तभंगाची कारवाई करावी, असे सक्त निर्देश आरोग्य सेवा संचालक डॉ. विजय कंदेवाड यांनी दिले.

आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या ०१ नोव्हेंबर रोजी झालेल्या 'आरोग्य संवाद यात्रा' दौऱ्यादरम्यान दिलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने ३ नोव्हेंबर रोजी डॉ. कंदेवाड यांच्या अध्यक्षतेखाली नांदेड येथे आरोग्य विभागाची आढावा बैठक घेण्यात आली. आरोग्य संवाद यात्रेदरम्यान काही ठिकाणी कामकाजात आढळलेल्या त्रुटी व अनियमिततांची गंभीर दखल घेऊन संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांची सखोल चौकशी करावी, दोषींवर शिस्तभंगाची कारवाई करावी आणि आवश्यकतेनुसार बदलीचे प्रस्ताव सादर करावेत, असे निर्देश त्यांनी दिले. जिल्ह्यातील प्रत्येक अधिकाऱ्याची कामानुसार जबाबदारी निश्चित करून कामकाजाचे नियमित मूल्यमापन करण्यावरही त्यांनी भर दिला.सर्व आरोग्य संस्थांमध्ये २४ तास अत्यावश्यक आरोग्य सेवा उपलब्ध ठेवाव्यात. रुग्णांना बाहेरून औषधे खरेदी करण्यास सांगू नये. जीवनावश्यक व जीवनरक्षक औषधांचा पुरेसा साठा, १०२ व १०८ रुग्णवाहिका सेवा, प्रयोगशाळा तपासण्या आणि एक्स-रे सुविधा नियमित उपलब्ध ठेवाव्यात. वैद्यकीय उपकरणे कार्यान्वित ठेवून त्यांची नियमित देखभाल करावी. रुग्णालयातील स्वच्छता, शुद्ध पिण्याचे पाणी, रुग्णांना दिला जाणारा आहार आणि कंत्राटी सेवांचा दर्जा उत्तम राखण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांशी सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांनी सौजन्यपूर्ण व संवेदनशीलतेने वागावे, असेही स्पष्ट केले.

सर्व नियमित व कंत्राटी अधिकारी-कर्मचाऱ्यांची बायोमेट्रिक पोर्टलवरील नोंदणी ४ नोव्हेंबरपर्यंत पूर्ण करावी. फेस रीडिंग व बायोमेट्रिक प्रणालीद्वारे उपस्थिती नोंदविणे बंधनकारक असून, उपस्थितीच्या आधारेच वेतन अदा करावे. यामध्ये अनियमितता आढळल्यास संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांचीही जबाबदारी निश्चित करण्यात येईल. वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मुख्यालयी वास्तव्य करून रुग्णसेवा द्यावी. तसेच वैद्यकीय अधिकारी, विशेषज्ञ व इतर कर्मचाऱ्यांच्या सेवांचे योग्य नियोजन करून त्यांच्या कामकाजाचे नियमित मूल्यमापन करावे, असे निर्देश देण्यात आले.



जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक व वरिष्ठ जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांनी महिन्यातून किमान पाच आरोग्य संस्थांना प्रत्यक्ष भेटी देऊन रुग्णसेवा, प्रशासकीय कामकाज व उपलब्ध सुविधांचा आढावा घ्यावा. आरोग्य सेवा, कर्मचारी उपस्थिती, औषधसाठा, वैद्यकीय सुविधा आणि शासकीय योजनांच्या अंमलबजावणीत हलगर्जीपणा किंवा अनियमितता आढळल्यास संबंधित पान ४ वर

दुष्काळाचे चटके आणि धर्मांधतेचा दाह!

महाराष्ट्रासह देशातील अनेक राज्यांमध्ये यंदा पावसाने ओढ दिल्याने दुष्काळाचे सावट गडद होऊ लागले आहे. पिण्याच्या पाण्यापासून शेतीच्या सिंचनापर्यंत सर्वत्र पाण्याची टंचाई जाणवू लागली आहे. निसर्गाच्या लहरीपणाचा फटका बसणे नवीन नाही; मात्र प्रत्येक संकटाचे खापर निसर्गावर फोडून माणसाने आपल्या जबाबदारीतून पळ काढणे कितपत योग्य आहे? अल निनो हे निश्चितच नैसर्गिक संकट आहे; परंतु त्याला निमित्त करून पर्यावरणाच्या ऱ्हासाकडे दुर्लक्ष करता येणार नाही. विकासाच्या नावाखाली होणारी बेसुमार वृक्षतोड, बदलती जीवनशैली, वाढते प्रदूषण आणि निसर्गाकडे पाहण्याचा माणसाचा स्वार्थी दृष्टिकोन ही संकटाची खरी पार्श्वभूमी आहे. दुर्दैवाने पर्यावरण रक्षणापेक्षा धार्मिक भावना दुखावल्याचा कांगावा करण्यातच काही मंडळी धन्यता मानत आहेत.गणेशोत्सवातील डीजेच्या कर्णकर्कश आवाजावरून काही दिवसांपूर्वी झालेला गदारोळ याचे उत्तम उदाहरण आहे. ध्वनीप्रदूषणाचे दुष्परिणाम समाजासमोर मांडणारे विद्यानंद बापट यांच्यासारखे अभ्यासू नागरिक प्रश्न उपस्थित करतात, तेव्हा त्यांना समजून घेण्याऐवजी त्यांच्यावर हल्ले होतात. धार्मिक भावना दुखावल्याचे कारण पुढे केले जाते. वास्तविक, कोणत्याही धर्माने माणसाच्या आरोग्याला धोका निर्माण करणाऱ्या आवाजाचा अतिरेक करावा, असे सांगितलेले नाही. संगीताचा आनंद घेणे आणि ध्वनीप्रदूषणाच्या माध्यमातून शक्तिप्रदर्शन करणे यातील फरक समजून घेण्याची गरज आहे. धर्माच्या नावाखाली रात्री उशिरापर्यंत कानठळ्या बसविणारा आवाज करणे, यालाच जर धर्मरक्षण समजले जात असेल तर अशा धर्मरक्षणाचा समाजाला उपयोग काय? दुसरीकडे दिवाळीतील फटाक्यांमुळे होणारे वायू आणि ध्वनीप्रदूषण रोखण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी चिंता व्यक्त केली आहे. न्यायालयाच्या निर्देशांच्या पार्श्वभूमीवर मुंबई महापालिकेने काही प्रतिष्ठित कलाकारांना सोशल मीडियाच्या माध्यमातून प्रदूषणमुक्त दिवाळीचा संदेश देण्याचे आवाहन केले. माधुरी दीक्षित, सचिन तेंडुलकर यांच्यासह अभिनेत्री दिया मिर्झा यांनीही दिवाळीच्या शुभेच्छा देत पर्यावरणपूरक सण साजरा करण्याचे आवाहन केले. मात्र दिया मिर्झा यांचे नाव पाहून भाजपचे मुंबई प्रदेशाध्यक्ष अमित साटम यांचा पारा चढला. दिया मिर्झासारख्या व्यक्ती आम्हाला दिवाळी कशी साजरी करावी हे सांगणार का, असा सवाल उपस्थित करण्यात आला. त्यानंतर महापालिकेने विलंब न लावता तिचा संदेश अधिकृत खात्यावरून हटविला. प्रशासनाची ही तत्परता नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांवरही कधी दिसणार? विशेष म्हणजे, पर्यावरण रक्षणाचा संदेश देणाऱ्या एका अभिनेत्रीच्या धर्माची किंवा नावाची चिकित्सा करण्याची गरजच काय? दिवाळीच्या शुभेच्छा देण्याचा आणि प्रदूषण टाळण्याचे आवाहन करण्याचा अधिकार प्रत्येक भारतीय नागरिकाला आहे. भारताची ओळख धर्मनिरपेक्ष राष्ट्र अशी आहे. येथे धर्माच्या सीमा ओलांडून एकमेकांच्या सण-उत्सवांत सहभागी होण्याची समृद्ध परंपरा आहे. अशा परंपरेला राजकीय चष्म्यातून पाहणे म्हणजे सामाजिक ऐक्याच्या मुळावर घाव घालण्यासारखे आहे. काही राजकीय नेते आणि कार्यकर्त्यांनी दिया मिर्झा यांना लक्ष्य करण्याचा प्रयत्न केला, हे लोकशाहीच्या सहिष्णू संस्कृतीला शोभणारे नाही. या प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाने हस्तक्षेप करून कोणालाही दुसऱ्या धर्माच्या सणानिमित्त शुभेच्छा देण्याचा अधिकार असल्याचे स्पष्ट केले आणि महापालिकेला संदेश पुन्हा प्रसारित करण्याचे निर्देश दिल्याचे वृत्त आहे. न्यायालयाने दिलेला हा संदेश केवळ दिया मिर्झा यांच्यापुरता मर्यादित नाही, तर संविधानाने प्रत्येक नागरिकाला दिलेल्या समानतेच्या आणि अभिव्यक्तिस्वातंत्र्याच्या अधिकाराची आठवण करून देणारा आहे. न्यायालयाच्या भूमिकेवर राजकीय सोयीनुसार भाष्य करण्याऐवजी तिचा घटनात्मक आशय समजून घेण्याची आवश्यकता आहे.मात्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुरुवातीला उच्च न्यायालयाने असे आदेश दिले नसल्याचे सांगितले. हा विषय माझ्या स्तराचा नाही, दिया मिर्झा काही फार मोठी राजकारणी नाही, तिची दखल उच्च न्यायालय घेईल असे वाटत नाही, अशा आशयाची भूमिका त्यांनी मांडल्याचे समोर आले. मुख्यमंत्र्यांसारख्या घटनात्मक पदावरील व्यक्तीकडून अशी टिप्पणी अपेक्षित आहे काय? न्यायालयात कोणता विषय महत्त्वाचा आणि कोणता किरकोळ हे ठरविण्याचा अधिकार राजकीय नेत्यांना आहे काय? न्याय मागणाऱ्या व्यक्तीचे पद, प्रतिष्ठा, राजकीय वजन किंवा सामाजिक ओळख पाहून न्यायालयाने प्रकरणाची दखल घ्यावी, अशी अपेक्षा लोकशाहीच्या कोणत्या तत्त्वात बसते? न्याय हा मुख्यमंत्र्यांच्या स्तराचा किंवा सामान्य नागरिकांच्या स्तराचा असा विभागता येत नाही. कायद्यापुढे सर्व समान आहेत, हे संविधानाचे मूलभूत तत्त्व आहे. एखादी व्यक्ती राजकारणी नसली, मोठी सेलिब्रिटी नसली किंवा सत्तेच्या वर्तुळात नसली तरी तिच्या अधिकारांचे संरक्षण होणे तितकेच महत्त्वाचे आहे. उलट सामान्य नागरिकाच्या अधिकारांसाठीच न्यायव्यवस्था अधिक सजग असणे अपेक्षित आहे. आज एका बाजूला दुष्काळाचे संकट आहे, पाण्याचे स्रोत आटत आहेत, जंगलांचा ऱ्हास सुरू आहे आणि प्रदूषणाचा विळखा घट्ट होत आहे. अशा वेळी पर्यावरणाचा संदेश देणाऱ्या व्यक्तीला धर्माच्या नावाखाली लक्ष्य केले जाते. निसर्गाच्या रक्षणापेक्षा धार्मिक अस्मितांचे राजकारण मोठे ठरविले जाते. विकासाच्या नावाखाली वृक्षतोड करताना आवाज उठत नाही; मात्र प्रदूषण रोखण्याचे आवाहन केले की धार्मिक भावना जाग्या होतात. ही दुटप्पी मानसिकता बदलल्याशिवाय दुष्काळावर मात करण्याच्या गप्पांना अर्थ उरणार नाही. निसर्गाला धर्म नसतो, पाण्याला जात नसते आणि प्रदूषणाला राजकीय पक्ष नसतो. दुष्काळाचा फटका बसतो तो सर्वसामान्य माणसाला. त्यामुळे पर्यावरण रक्षण हा कोणत्याही एका धर्माचा, पक्षाचा किंवा विचारसरणीचा विषय नसून संपूर्ण मानवजातीच्या अस्तित्वाचा प्रश्न आहे. धर्माच्या नावाखाली माणसाचा आवाज दाबण्यापेक्षा निसर्गाच्या आक्रोशाकडे लक्ष देण्याची वेळ आली आहे. अन्यथा उद्या पाण्याच्या प्रत्येक थेंबासाठी संघर्ष करावा लागेल आणि तेव्हा धार्मिक अस्मितांच्या घोषणा तहान भागवू शकणार नाहीत!

सिंहस्थ कुंभमेळा श्रद्धेचा उत्सव ठरावा,राजकीय शक्तिप्रदर्शनाचा नव्हे!

अध्यात्माचे पावित्र्य जपत ग्रामीण जनतेच्या प्रश्नांनाही प्राधान्य द्या



राजकारणात कोण कोणाचा मित्र आणि कोण कोणाचा शत्रू असेल, हे सांगणे कठीण असते. राजकीय सोयीनुसार मैत्रीचे संबंध निर्माण होतात आणि स्वार्थ संपल्यानंतर तेच संबंध क्षणात बदलतात. निवडणुकीच्या काळात सामान्य माणूस राजकारण्यांना आपल्या कुटुंबातील सदस्यासारखा वाटतो. त्याच्या घरी जाणे, त्याची विचारपूस करणे, सुख-दुःखात सहभागी होण्याचे आश्वासन देणे, त्याच्या समस्या सोडविण्याची ग्वाही देणे, असे अनेक प्रकार घडतात. मात्र, निवडणूक संपली की या आश्वासनांचे काय होते, याचा अनुभव सर्वसामान्य नागरिकांना वारंवार येत असतो. मतांची गरज असेपर्यंत मतदार महत्त्वाचा आणि निवडणूक झाल्यानंतर तोच मतदार अडगळीत, अशी राजकीय कार्यपद्धती लोकशाहीसाठी निश्चितच भूषणावह नाही.

नगरसेवकांच्या निवडणुकीतही हे चित्र प्रकर्षाने दिसून येते. निवडणुकीपूर्वी उमेदवारांची भाषा अत्यंत गोड असते. प्रत्येक मतदाराला मान-सन्मान दिला जातो. त्याच्या अडचणी ऐकल्या जातात. पाणी, रस्ते, वीज, स्वच्छता, आरोग्य अशा मूलभूत प्रश्नांवर तातडीने उपाययोजना करण्याची आश्वासने दिली जातात. मात्र, निवडून आल्यानंतर अनेक लोकप्रतिनिधींचे प्राधान्यक्रम बदलतात. सामान्य नागरिकांना भेटण्यासाठी त्यांच्याकडे वेळ राहत नाही. मोठ्या नेत्यांच्या पुढे-मागे करण्यात आणि राजकीय कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्यातच त्यांचा बहुतांश वेळ खर्च होतो. ज्या जनतेने त्यांना निवडून दिले, त्याच जनतेच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष केले जाते. ही लोकशाहीची थट्टा नाही तर काय? मतदारांनी कोणाला मतदान करावे, हा त्यांचा घटनात्मक अधिकार आहे. त्यासाठी त्यांना कोणत्याही प्रकारचे आमिष दाखविण्याची गरज नसते. मतदाराने स्वेच्छेने दिलेले मत हे लोकशाहीवरील विश्वासाचे प्रतीक असते. त्यामुळे ज्यांनी आपल्याला निवडून दिले, त्यांच्याशी सन्मानाने वागणे ही लोकप्रतिनिधींची नैतिक जबाबदारी आहे. मतदार गरीब आहे, अशिक्षित आहे, अडाणी आहे किंवा आपल्यावर अवलंबून आहे, म्हणून त्याचा अपमान करण्याचा अधिकार कोणालाही नाही. एखाद्या व्यक्तीने एखाद्या पक्षाच्या विचारधारेशी निष्ठा ठेवली असेल, तर त्या निष्ठेचा आदर करणेही तितकेच आवश्यक आहे. पक्षाची विचारधारा आणि कार्यकर्त्यांची प्रतिष्ठा जपण्याची जबाबदारी पक्षनेतृत्वाची असते.काही ठिकाणी पती-पत्नी दोघेही आलटून-पालटून लोकप्रतिनिधी म्हणून निवडून येतात. मात्र, निवडणुकीनंतर पाच वर्षे सामान्य नागरिकांना त्यांचे दर्शनही होत नाही. त्यांच्या कामांची माहिती प्रत्यक्ष जनतेला मिळण्याऐवजी वृत्तपत्रांमधील छायाचित्रे आणि प्रसिद्धिपत्रकांतूनच मिळते. हा प्रकार लोकप्रतिनिधित्वाच्या मूळ संकल्पनेलाच हरताळ फासणारा आहे. जनतेच्या मतांवर निवडून आलेल्या व्यक्तींनी जनतेशी संपर्क ठेवणे, तिच्या अडचणी समजून घेणे आणि त्या सोडविण्यासाठी प्रयत्न करणे अपेक्षित आहे. निवडणुकीच्या वेळी हात जोडून उभे राहणाऱ्यांनी निवडून आल्यानंतरही त्याच नम्रतेने जनतेसमोर उभे राहिले पाहिजे.

आज अनेक भागांमध्ये पाणीप्रश्न गंभीर बनत चालला आहे. नागरिकांना पाण्यासाठी वारंवार लोकप्रतिनिधींना फोन करावे लागतात. मात्र, काही लोकप्रतिनिधी साधा फोनही उचलत नाहीत. पाण्यासारख्या मूलभूत गरजेच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करणे ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. नागरिकांच्या समस्या ऐकून घेण्यासाठी लोकप्रतिनिधींकडे वेळ नसेल, तर त्यांनी निवडणुकीत पदाची अपेक्षा तरी कशासाठी ठेवावी? केवळ निवडणुकीच्या काळात जनतेशी जवळीक दाखविणे आणि नंतर तिच्याकडे पाठ फिरविणे हा लोकशाहीतील विश्वासाला तडा देणारा प्रकार आहे.सार्वजनिक निधीचा वापर करताना पारदर्शकता असणेही आवश्यक आहे. कोणतेही काम मंजूर करताना त्याची गरज, अंदाजपत्रक, दर्जा आणि प्रत्यक्ष उपयोग यांची तपासणी झाली पाहिजे. नागरिकांच्या पैशातून होणाऱ्या कामांमध्ये अनियमितता किंवा मनमानीला थारा मिळता कामा नये. सार्वजनिक निधी हा कोणाच्याही वैयक्तिक मालकीचा नसतो. तो जनतेच्या करातून जमा झालेला असतो. त्यामुळे प्रत्येक रुपयाचा विनियोग जनहितासाठी झाला पाहिजे. लोकप्रतिनिधींनी या बाबीचे भान ठेवले नाही, तर जनतेचा रोष वाढल्याशिवाय राहणार नाही.

अशा परिस्थितीत नाशिकमध्ये होऊ घातलेल्या सिंहस्थ कुंभमेळ्याचा विचार करताना राजकीय हस्तक्षेपापासून या धार्मिक सोहळ्याला दूर ठेवण्याची आवश्यकता प्रकर्षाने जाणवते. कुंभमेळा हा केवळ एखादा सरकारी कार्यक्रम नाही किंवा राजकीय शक्तिप्रदर्शनाची संधीही नाही. तो भारतीय संस्कृती, सनातन परंपरा, अध्यात्म, साधना आणि श्रद्धेचा एक अत्यंत महत्त्वाचा सोहळा आहे. देशभरातील लाखो भाविक, साधू-संत, महंत, आखाडे आणि धार्मिक परंपरांशी जोडलेले लोक या मेळ्यात सहभागी होतात. त्यामुळे त्याचे नियोजन करताना धार्मिक पावित्र्य, परंपरा आणि भाविकांच्या सोयी यांना सर्वोच्च प्राधान्य मिळाले पाहिजे.कुंभमेळ्याला राजकीय रंग देण्याचा प्रयत्न होऊ नये. कोणत्याही पक्षाचे नेते, मंत्री, पदाधिकारी किंवा लोकप्रतिनिधी या धार्मिक सोहळ्यात सहभागी झाले, तर त्याला आक्षेप असण्याचे कारण नाही. मात्र, त्यांच्या उपस्थितीमुळे धार्मिक कार्यक्रमाचे स्वरूप बदलता कामा नये. व्यासपीठे, सत्कार समारंभ, राजकीय भाषणे आणि प्रसिद्धीच्या स्पर्धेपेक्षा अध्यात्म, साधना, धार्मिक विधी आणि भाविकांची सेवा यांना अधिक महत्त्व दिले पाहिजे. कुंभमेळा हा कोणत्याही राजकीय पक्षाचा नसून संपूर्ण समाजाचा आणि देशाच्या सांस्कृतिक परंपरेचा आहे, याचे भान सर्वांनी ठेवले पाहिजे. याचबरोबर कुंभमेळ्याच्या निमित्ताने धार्मिक पदव्या आणि उपाधींच्या प्रतिष्ठेचा प्रश्नही गांभीर्याने विचारात घेण्याची गरज आहे. आजकाल कोणालाही जगद्गुरू, महामंडलेश्वर किंवा हजार आठ यांसारख्या पदव्या धारण करून मिरवताना पाहायला मिळते. मात्र, अशा पदव्या धारण करणाऱ्या व्यक्तींची विद्वत्ता, धार्मिक अभ्यास, आचरण आणि आध्यात्मिक योगदान यांची पडताळणी होणे आवश्यक आहे. जगद्गुरू ही उपाधी केवळ नावापुढे लावण्याची गोष्ट नाही. तिच्यामागे व्यापक शास्त्रज्ञान, धर्मचिंतन, तत्त्वज्ञान, साधना आणि समाजाला योग्य दिशा देण्याची क्षमता अपेक्षित असते.चार वेद, सहा शास्त्रे आणि अठरा पुराणांचा अभ्यास, भारतीय तत्त्वज्ञानाची जाण, धर्मपरंपरांचे सखोल ज्ञान आणि समाजप्रबोधनाची क्षमता या बाबी अशा पदांसाठी महत्त्वाच्या ठरल्या पाहिजेत. केवळ मोठ्या आवाजात बोलणे, आकर्षक वेशभूषा करणे किंवा अनुयायांचा मोठा समूह असणे म्हणजे आध्यात्मिक श्रेष्ठत्व नव्हे. एखाद्या व्यक्तीला धार्मिक उपाधी दिली जात असेल, तर तिच्या ज्ञानाची आणि कार्याची योग्य कसोटी लावली पाहिजे. अन्यथा अशा पवित्र उपाधींचे अवमूल्यन होण्याचा धोका आहे. पूर्वीच्या काळात जगद्गुरूंच्या व्यक्तिमत्त्वात एक वेगळे तेज, विद्वत्ता आणि आध्यात्मिक प्रभाव जाणवत असे. त्यांच्या विचारांतून समाजाला दिशा मिळत असे. त्यांच्या प्रवचनातून केवळ धार्मिक माहिती नव्हे, तर जीवन जगण्याची शिकवण मिळत असे. आज मात्र काही ठिकाणी धार्मिक उपाधींचे प्रदर्शन आणि प्रसिद्धी मिळविण्याची स्पर्धा अधिक दिसून येते. साधा संवादही प्रभावीपणे साधता न येणाऱ्या व्यक्तींना मोठमोठ्या उपाधी देऊन त्यांचा गौरव करणे योग्य आहे का, हा प्रश्न उपस्थित होतो. प्रत्येक व्यक्तीचा सन्मान असला पाहिजे; परंतु सन्मान आणि धार्मिक पदवी यांतील फरकही लक्षात घेतला पाहिजे.सरकारनेही अशा बाबतीत घाईघाईने निर्णय घेण्याऐवजी संबंधित धार्मिक परंपरा, आखाडे, विद्वान आणि जाणकारांशी चर्चा करावी. धार्मिक संस्थांच्या स्वायत्ततेचा आदर राखून अशा पदव्यांच्या प्रतिष्ठेचे रक्षण करण्यासाठी आवश्यक ती चर्चा व्हावी. कोणालाही केवळ राजकीय जवळीक, आर्थिक ताकद किंवा प्रसिद्धीच्या जोरावर धार्मिक क्षेत्रातील मोठेपणा बहाल केला जाऊ नये. धर्म आणि अध्यात्म यांचा संबंध आचरण, ज्ञान आणि साधनेशी असतो. त्याचे मोजमाप केवळ बाह्य दिखाव्यावर करता येत नाही.

देशातील विविध कुंभमेळ्यांचा अनुभव घेतल्यानंतर एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते की प्रत्येक कुंभमेळ्याचे स्वतःचे धार्मिक आणि सांस्कृतिक वैशिष्ट्य असते. प्रयागराज, हरिद्वार, उज्जैन आणि नाशिक येथील कुंभमेळे ही भारतीय धार्मिक परंपरेची महत्त्वाची केंद्रे आहेत. या ठिकाणी आखाड्यांच्या परंपरा, साधू-संतांचे धार्मिक विधी, शाही स्नान, प्रवचने आणि भाविकांची श्रद्धा यांचा संगम पाहायला मिळतो. अशा सोहळ्यांमध्ये चैतन्य निर्माण होण्यासाठी नियोजनाबरोबरच धार्मिक परंपरांचे पालन करणेही आवश्यक असते.मात्र, कुंभमेळ्याच्या आयोजनात अनेकदा नियोजनाचा अभाव, गर्दीचे अयोग्य व्यवस्थापन आणि सुरक्षेतील त्रुटी समोर येतात. लाखो भाविक एकाच ठिकाणी एकत्र येत असताना त्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी अत्यंत महत्त्वाची असते. गर्दीचे नियंत्रण, वाहतूक व्यवस्था, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, आरोग्य सुविधा, आपत्कालीन सेवा आणि निवासव्यवस्था यांचे काटेकोर नियोजन झाले पाहिजे. गर्दीच्या वेळी होणारी चेंगराचेंगरी ही केवळ अपघाती घटना नसते; अनेकदा नियोजनातील त्रुटी आणि प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे निष्पाप भाविकांना जीव गमवावा लागतो. त्यामुळे पूर्वनियोजन आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी या दोन्ही बाबींवर विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. कुंभमेळ्याच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध होतो. रस्ते, पूल, घाट, प्रकाशव्यवस्था, पाणीपुरवठा, स्वच्छता आणि इतर पायाभूत सुविधांसाठी कोट्यवधी रुपये खर्च केले जातात. मात्र, या खर्चाचा प्रत्यक्ष फायदा भाविकांना आणि स्थानिक नागरिकांना झाला पाहिजे. केवळ आकर्षक प्रवेशद्वारे, भव्य सजावट, मोठमोठे फलक आणि प्रसिद्धी यावर भर देण्याऐवजी मूलभूत सुविधांची उभारणी झाली पाहिजे. मेळा संपल्यानंतरही या सुविधा स्थानिक जनतेच्या उपयोगात आल्या पाहिजेत. सार्वजनिक निधीचा वापर हा दीर्घकालीन विकासाच्या दृष्टीने झाला, तरच त्याला खऱ्या अर्थाने अर्थ प्राप्त होईल.याच ठिकाणी ग्रामीण भागातील जनतेच्या प्रश्नांकडे लक्ष देणे आवश्यक ठरते. आजही अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची समस्या गंभीर आहे. उन्हाळा सुरू झाला की पाण्यासाठी नागरिकांची भटकंती सुरू होते. महिलांना लांब अंतरावरून पाणी आणावे लागते. जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होतो. काही गावांमध्ये टँकरवर अवलंबून राहावे लागते. ही परिस्थिती लक्षात घेता कुंभमेळ्याच्या आयोजनात धार्मिक सोहळ्याबरोबरच ग्रामीण भागातील पाणीटंचाईचा विचार करणे ही काळाची गरज आहे.

कुंभमेळ्यात सहभागी होणाऱ्या साधू-संतांनी, धार्मिक संस्थांनी आणि दानशूर व्यक्तींनीही समाजाप्रती आपली जबाबदारी ओळखली पाहिजे. सत्कार, सन्मान, हारतुरे, मानपत्रे आणि प्रसिद्धी यापलीकडे जाऊन समाजसेवेचा विचार केला पाहिजे. धार्मिक कार्यक्रमांवर होणारा अनावश्यक खर्च कमी करून ग्रामीण भागातील गरजू नागरिकांसाठी पाणीपुरवठा, जलसंधारण, विहिरींची दुरुस्ती, पाण्याच्या टाक्या आणि इतर मूलभूत सुविधांसाठी सहकार्य करता येईल. अशा प्रकारचे योगदान दिल्यास धार्मिक सोहळ्याला सामाजिक सेवेची जोड मिळेल.धर्माचा खरा अर्थ केवळ पूजा-अर्चा, विधी आणि प्रवचनांपुरता मर्यादित नाही. तहानलेल्या माणसाला पाणी देणे, भुकेल्याला अन्न देणे, गरजूला मदत करणे आणि दुःखी व्यक्तीच्या अडचणी दूर करण्यासाठी प्रयत्न करणे, हीदेखील धर्माचीच शिकवण आहे. त्यामुळे कुंभमेळ्यातील साधू-संतांनी समाजातील शेवटच्या घटकाचा विचार करावा. त्यांच्या सत्कार-सन्मानापेक्षा ग्रामीण जनतेच्या चेहऱ्यावर समाधान निर्माण होणे अधिक महत्त्वाचे आहे. धार्मिक क्षेत्रातील मोठेपणा हा समाजासाठी केलेल्या कार्यातून सिद्ध झाला पाहिजे.

आज ग्रामीण भागातील नागरिकांना आणखी आठ महिने पाण्यासाठी प्रतीक्षा करावी लागणार असेल, तर हा प्रश्न केवळ प्रशासनाचा नाही, तर संपूर्ण समाजाच्या संवेदनशीलतेचा आहे. कुंभमेळ्याच्या आयोजनासाठी मोठ्या प्रमाणावर संसाधने खर्च करताना अशा जनतेच्या वेदनांकडे दुर्लक्ष होता कामा नये. सरकारने ग्रामीण भागातील पाणीटंचाईचा आढावा घेऊन आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात. जलसंधारण, पावसाचे पाणी साठविणे, तलावांचे पुनरुज्जीवन, नादुरुस्त जलवाहिन्यांची दुरुस्ती आणि पाणीपुरवठा योजनांची प्रभावी अंमलबजावणी यावर भर दिला पाहिजे.नाशिकचा सिंहस्थ कुंभमेळा हा धार्मिक परंपरा आणि अध्यात्माचे दर्शन घडविणारा सोहळा ठरावा. त्यामध्ये राजकीय स्वार्थ, पदांची स्पर्धा आणि प्रसिद्धीचा हव्यास यांना स्थान नसावे. सरकारने नियोजन करताना सर्व आखाडे, धार्मिक परंपरांचे प्रतिनिधी, विद्वान, सामाजिक संस्था आणि स्थानिक नागरिक यांच्याशी संवाद साधावा. निर्णय घेताना भाविकांची सुरक्षितता, धार्मिक परंपरांचे पावित्र्य आणि स्थानिक जनतेचे हित या तीन बाबी केंद्रस्थानी ठेवाव्यात.

कुंभमेळ्याचे स्वरूप भव्य असलेच पाहिजे, असा आग्रह धरण्यापेक्षा तो सुरक्षित, शिस्तबद्ध, पारंपरिक आणि भाविकांसाठी सुविधाजनक असणे अधिक महत्त्वाचे आहे. गरज पडल्यास अनावश्यक दिखावा आणि खर्च टाळून साधेपणाने आयोजन केले तरी हरकत नाही. कारण मेळ्याचे यश त्यातील भव्य सजावटीत नसून भाविकांच्या समाधानात, धार्मिक परंपरांच्या जतनात आणि समाजाला मिळणाऱ्या सकारात्मक संदेशात आहे.शेवटी एकच सांगावेसे वाटते की, जनतेच्या श्रद्धेचा आणि भावनांचा आदर करा. लोकप्रतिनिधींनी मतदारांना केवळ निवडणुकीपुरते महत्त्व देऊ नये. धार्मिक क्षेत्रातील व्यक्तींनी पदव्या आणि सन्मानापेक्षा ज्ञान, साधना आणि समाजसेवेला प्राधान्य द्यावे. सरकारने कुंभमेळ्याच्या आयोजनात राजकीय गणितांपेक्षा धार्मिक परंपरा आणि जनहिताचा विचार करावा. निसर्गाचा स्वभाव कधी बदलेल, संकट कधी कोसळेल, हे सांगता येत नाही. त्यामुळे पाणी, पर्यावरण आणि जनतेच्या मूलभूत गरजांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

नाशिकचा सिंहस्थ कुंभमेळा हा राजकीय शक्तिप्रदर्शनाचा नव्हे, तर श्रद्धा, संस्कृती, अध्यात्म, सेवा आणि सामाजिक एकात्मतेचा उत्सव ठरला पाहिजे. साधू-संतांचा सन्मान व्हावा; मात्र त्यांच्या माध्यमातून समाजसेवेचा संदेशही दिला जावा. ग्रामीण जनतेच्या पाण्याचा प्रश्न सुटावा, भाविक सुरक्षित राहावेत आणि धार्मिक परंपरांचे पावित्र्य टिकावे, हीच अपेक्षा. कुंभमेळा संपल्यानंतरही जनतेच्या जीवनात चांगला बदल घडला, तरच या भव्य आयोजनाचे सार्थक होईल. अन्यथा कोट्यवधींचा खर्च, मोठमोठे सोहळे आणि प्रसिद्धी यांचा सामान्य माणसाला काय उपयोग? हा प्रश्न अनुत्तरितच राहील.



दत्तोपंत डहाळे
नांदेड.

आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांची सहकारसूर्य मुख्यालयास सदिच्छा भेट



नांदेड/प्रतिनिधी-प्रशिक्षित कर्मचारी, प्रभावी व्यवस्थापन आणि जनतेने दाखविलेला विश्वास यांची उत्कृष्ट सांगड घालत गोदावरी अर्बनने सहकार क्षेत्रात निर्माण केलेली ओळख आणि सुरू असलेला प्रगतीचा प्रवास निश्चितच कौतुकास्पद आहे, असे गौरवोद्गार महाराष्ट्र राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी काढले.

मंत्री प्रकाश आबिटकर यांनी गोदावरी अर्बनच्या सहकारसूर्य येथील मुख्यालयास सदिच्छा भेट दिली. यावेळी संस्थेचे संस्थापक आ. हेमंत पाटील, आ.आनंदराव बोंढारकर, अध्यक्षा राजश्री हेमंत पाटील यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते.या भेटी दरम्यान मंत्री आबिटकर यांनी संस्थेच्या कामकाजाची माहिती घेतली. सहकार क्षेत्रात विश्वासार्हता जपत आधुनिक व्यवस्थापन, प्रशिक्षित मनुष्यबळ आणि ग्राहकाभिमुख सेवा यांच्या माध्यमातून गोदावरी अर्बनने केलेली प्रगती उल्लेखनीय असल्याचे त्यांनी नमूद केले. संस्थेच्या यशस्वी वाटचालीत कर्मचारी आणि ग्राहक यांच्यातील विश्वासाचे नाते महत्त्वपूर्ण असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.यावेळी गोदावरी अर्बनचे सहाय्यक सरव्यवस्थापक विजय शिरमेवार,विपणन अधिकारी महेश केंद्रे,आयटी मॅनेजर पवन यादव,डेप्युटी मॅनेजर प्रशांत कदम यांच्यासह कर्मचारी वृंद उपस्थित होते.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
मुख्यसंपादक-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
सहसंपादक-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

सचखंड गुरुद्वारा येथे ऐतिहासीक दिवाळी सणास प्रारंभ

रवीन्द्रसिंघ मोदी



नांदेड:येथील गुरुद्वारा तख्त सचखंड श्री हजुरसाहेब गुरुद्वारात बुधवार पासून पारंपरिक दिवाळी सणास सुरुवात होत आहे. बुधवार दि.४ रोजी दीपमाली अंतर्गत गुरुद्वारात पहिला दीवा प्रज्वल्लित करण्यात येईल. असंख्य भाविक गुरुद्वारा परिसरात दीवा लावून आपल्या भावना व्यक्त करतात.दि.७ रोजी पारंपरिक तख्तस्नान साजरा करण्यात येईल. तखतस्नान मध्ये हजारों भाविक सामूहिकपणे गुरुद्वारा स्वच्छ करण्याची सेवा करतात. गोदावरी नदीतून पाणी आणून गुरुद्वारा स्वच्छ करण्याची जुनी परंपरा आहे.

दि. ८ रोजी दिवाळी दीपमाला मुख्य सण साजरा करण्यात येईल. सायंकाळी आतिशबाजीचा कार्यक्रम सादर होईल. दिवाळी निमित्त दि. ९ रोजी दिवाली हल्ला महल्ला मिरवणूक पार पडणार आहे. दि. ११ नोव्हेंबर रोजी श्री गुरु ग्रंथसाहिब गुरुतागद्दी सोहळा साजरा करण्यात येणार आहे. दि. ११ ते १५ पर्यंत चलणाऱ्या सोहळ्यात कीर्तन दरबार आणी इतर धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दि. १४ नोव्हेंबर रोजी परलोकगमन आणी सामूहिक जाप कार्यक्रम होईल. दि. १५ रोजी गुरुतागद्दी सोहळा सांगता मिरवणूक काढण्यात येईल. आठवडाभराहुन जास्त दिवस चालणारे धार्मिक कार्यक्रमात मोठ्या संख्येत बाहेरून भाविकांची हजेरी राहणार आहे. नांदेड येथे साजरा होणाऱ्या सणास देशात आणी विदेशात विशेष आकर्षण असते.

मुदखेड येथे स्मशानभूमीत अंधार,रस्त्यांची दुरवस्था;काँग्रेसचे मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

मुदखेड/प्रतिनिधी-मुदखेड शहरातील पाणीटंचाई, स्मशानभूमीतील अपुऱ्या विद्युत सुविधांसह पाईपलाईनच्या कामासाठी खोदून ठेवलेल्या रस्त्यांच्या समस्यांकडे नगरपरिषदेचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत शहर काँग्रेसच्या वतीने प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले आहे. नागरिकांना भेडसावणाऱ्या या समस्यांची तातडीने सोडवणूक करावी, या मागणीसाठी नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.



मुदखेड शहरात पाणीटंचाईचा प्रश्न गंभीर बनत असून नागरिकांना पाण्यासाठी अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. तसेच शहरातील स्मशानभूमीत विद्युत रोषणाईची पुरेशी व्यवस्था नसल्याने अंत्यसंस्कारासाठी येणाऱ्या नागरिकांना गैरसोयींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे स्मशानभूमीत तातडीने विद्युत रोषणाईची व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी केली आहे.दरम्यान, पाईपलाईनच्या कामासाठी शहरातील विविध भागांतील रस्ते खोदण्यात आले आहेत. मात्र, काम पूर्ण झाल्यानंतर रस्त्यांची पूर्ववत दुरुस्ती करण्याकडे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे. नियोजनाअभावी शासकीय निधीचा अपव्यय होत असल्याचा आरोपही काँग्रेसने केला आहे. खोदलेले रस्ते तातडीने दुरुस्त करून वाहतुकीसाठी सुरळीत करावेत, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.शहरातील मूलभूत नागरी सुविधांचा प्रश्न प्राधान्याने सोडवून नागरिकांना दिलासा द्यावा, अन्यथा प्रशासनाच्या कार्यपद्धतीविरोधात आवाज उठविण्यात येईल, अशी भूमिका काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी मांडली.या निवेदनावर गिरीश कोत्तावार, मुजीब पठाण, गंगाधर डांगे, विठ्ठलाचार्य, गंगाधर मगरे, शिवानंद देवखे, अतीक अहमद यांच्यासह काँग्रेसचे अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

अनधिकृत वीज वापरकर्त्यांविरुद्ध महावितरणची धडक कारवाई


नांदेड/प्रतिनिधी-कृषीपंप धारक शेतकरी आणि घरगुती व इतर वर्गवारीतील वीज ग्राहकांना अखंडीत व सुरळीत वीज पुरवठा करता यावा यासाठी महावितरणकडून अनधिकृत वीज वापरकर्त्यांविरूध्द मोहिम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत १००९ आकडेबहाद्दर वीजचोरांवर कारवाई करण्यात येऊन आकडे टाकून वीज चोरीसाठी वापरण्यात आलेल्या हजारो मीटर केबलची होळी करण्यात आली.

ग्रामीणसह गावठाण भागात मोठ्या प्रमाणात अनधिकृतपणे विजेचा वापर होत असल्याने अधिकृत वीज ग्राहकांना नाहक त्रास होत असल्याचे महावितरणच्या निदर्शनास आले. त्यामुळे महावितरणने अधिकृत ग्राहकांना अखंडीत आणि सुरळीत वीज पुरवठा करण्यासाठी अनधिकृत वीज वापरकर्त्यांविरूध्द मोहिम सुरू केलेली आहे. ही मोहीम कृषी आणि अकृषी भागातही राबविण्यात येत आहे. ऑक्टोबर २०२६ मध्ये राबविण्यात आलेल्या मोहिमेच्या तपशिलानुसार नांदेड जिल्ह्यातील देगलूर विभागात, भोकर १६३, नांदेड ग्रामीण विभागात ७०० तर नांदेड शहर विभागात १७३ आकडे बहादरांचे आकडे काढून त्यासाठी वापरण्यात आलेले हजारो मीटरर्स केबल जप्त करण्यात आले आहेत. काही ठिकाणी शेगड्या आणि हिटर्सही जप्त करण्यात आले आहेत. देगलूर विभागात अनेक ठिकाणी वीज वाहिन्यावर आकडे टाकण्यासाठी वापरण्यात आलेल्या केबलची होळी करून शेगड्या व हिटरर्स फोडण्यात आले. महावितरणने राबविलेल्या या मोहिमेमुळे वाहिन्यांवरील विजेचा ताणही नियंत्रणात येत आहे.

शिरूर हत्याकांड प्रकरणात आरोपी शिवाजी पडोळे यांची निर्दोष मुक्तता

भोकर/प्रतिनिधी-मौजे शिरूर (ता.उमरी) येथील गाजलेल्या खून प्रकरणात अखेर भोकर येथील जिल्हा व सत्र न्यायालयाने महत्त्वपूर्ण निकाल देत आरोपीची निर्दोष मुक्तता केली आहे.

प्राप्त माहितीनुसार, मौजे शिरूर येथील महिला किसनाबाई पुंडलिक पडोळे हिचा २५ फेब्रुवारी २०२० रोजी राहत्या घरी डोक्यात लाकडी धिपली मारून गंभीर जखमी करून खून करण्यात आला होता. या घटनेनंतर २६ फेब्रुवारी २०२० रोजी साईनाथ गंगाधर पडोळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलीस स्टेशन उमरी येथे गु.र.नं. ३९/२०२० कलम ३०२, ३९४ भारतीय दंड विधान अन्वये गुन्हा दाखल झाला होता. या गुन्ह्याचा तपास धर्माबाद येथील तत्कालीन डीवायएसपी सुनिल पाटील यांच्याकडे होता. तपासानंतर पोलिसांनी या प्रकरणातील आरोपी शिवाजी रावसाहेब पडोळे (रा.शिरूर, ता.उमरी) यांना ६ मे २०२० रोजी अटक करून न्यायालयात अंतिम दोषारोपपत्र दाखल केले होते. त्यानंतर हे प्रकरण जिल्हा व सत्र न्यायालय, भोकर येथे वर्ग करण्यात आले होते. सदर



प्रकरणामध्ये सरकारी पक्षातर्फे एकूण १४ साक्षीदार तपासण्यात आले होते. त्यामध्ये मयत किसनाबाई पुंडलिक पडोळे यांच्या मुली सुंदरबाई रावसाहेब नरवाडे, पंचफुलाबाई प्रभाकर पवार, अनुसयाबाई रामराव पाटील यांचीही साक्ष झाली होती. मात्र, सरकारी पक्ष आपली केस सिद्ध करण्यात अपयशी ठरला आणि आरोपी विरुद्ध सबळ पुरावा मिळून आला नसल्यामुळे भोकर येथील जिल्हा व सत्र न्यायाधीश. मोहम्मद नसीर मोहम्मद सलीम यांनी २ नोव्हेंबर रोजी आरोपी शिवाजी रावसाहेब पडोळे यांची सदरील प्रकरणातून निर्दोष मुक्तता केली. या खटल्यात आरोपीतर्फेॲड. शिवाजी कदम नागापूरकर यांनी भक्कम व प्रभावीपणे बाजू मांडली. त्यांच्या युक्तिवादा-मुळेच आरोपीची निर्दोष मुक्तता झाली.

नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.१६७६/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.०२/११/२०२६

जाहीर सुचना

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **१) काशिनाथ शामराव आडणे, २) भगवान शामराव आडणे** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **६७४/२१ गट क्र.६६१ प्लॉट क्र.२१** वरील नाव बदल करणे **दि. / / २०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **मोहम्मद खान तुराबखान पठाण** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- २/७०७४/२०२६ दि.१७.७.२०२६, २) बक्षीस पत्र :- ३) वारसा हक्क :- ४) वाटणी पत्र :- ५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील -- नगर/गल्ली मधील असून त्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- २५ फूट रुंद कॉमन, पश्चिमेस :- प्लॉट क्र.१८ आहे,उत्तरेस :- प्लॉट क्र.२२ आहे, दक्षिणेस :- प्लॉट क्र.२० आहे.

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
मुख्याधिकारी
नगर पंचायत,अर्धापूर

नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.१६३२/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.२७/१०/२०२६

जाहीर सुचना

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **स्नेहा शरद चरखा** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **१७९/११ गट क्र.१७९ प्लॉट क्र.११** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **श्री.स्वामी समर्थ इस्टेटचे भागीदार** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- १२९/२०२५ दि.१६.१.२०२५, २) बक्षीस पत्र :- ३) वारसा हक्क :- ४) वाटणी पत्र :- ५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील -- नगर/गल्ली मधील असून त्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- प्लॉट क्र.४८, पश्चिमेस :- ९ मिटर रुंद रोड, उत्तरेस :- प्लॉट क्र.१२, दक्षिणेस :- प्लॉट क्र.१०

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
मुख्याधिकारी
नगर पंचायत,अर्धापूर

जाहीर प्रगटन

५ वे न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,नांदेड यांचे न्यायालयात
इतर किरकोळ फौजदारी अर्ज क्र.१५०१/२०२६
शेख गौस वि.ग्रामसेवक

अर्जदार : शेख गौस पि.शेख महेबुब वय : ४२ वर्ष, रा.वाजेगाव ता.जि.नांदेड

विरुद्ध

गैरअर्जदार : ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय वाजेगाव ता.जि.नांदेड

जाहिर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार शेख गौस पि.शेख महेबुब वय ४२ वर्ष, रा. वाजेगाव ता.जि.नांदेड यांची मुलगी नामे सालेहा अंजुम शेख गौस हिचा जन्म दिनांक ०३/०४/२०१३ रोजी राहत्या घरी झाला असता अर्जदाराने जन्म प्रमाणपत्र रजिस्टर मध्ये नोंद होउन जन्म प्रमाणपत्र मिळण्याकामी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

तरी अर्जदारानी मागणी केले प्रमाणे संबंधीताचे नामे जन्म प्रमाणपत्र देण्या बाबत कुणाचा आक्षेप असेल तर त्यांनी दिनांक २३/१२/२०२६ पर्यंत प्रत्यक्ष किंवा वकीला मार्फत अगर आपल्या प्रतिनिधी मार्फत या न्यायालयात सकाळी ११.०० वाजता आपली बाजू मांडावी मुदतीत तशी तक्रार कोणाकडून न आलेस अर्जदार मागणी केल्या प्रमाणे त्यांना जन्म प्रमाणपत्र देण्याचा आदेश पारित करण्यात येईल.

सदरचे जाहीर प्रगटन आज दिनांक ३१.१०.२०२६ रोजी या न्यायालयाच्या सही व शिक्यानिशी देण्यात आले.

स्वाक्षरित/-
कनिष्ठ लिपीक
५ वे न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, नांदेड

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
सहाय्यक अधिक्षक
मुख्य न्यायदंडाधिकारी,नांदेड

जाहीर प्रगटन

६ वे न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,नांदेड यांचे न्यायालयात
ईतर किरकोळ फौजदारी अर्ज क्र.१५०२/२०२६
नोटीस

अर्जदार : शेख गौस पि.शेख महेबुब वय : ४२ वर्ष, रा.वाजेगाव मो.क्र.८८०५१२५४१३ नांदेड ता.जि.नांदेड

विरुद्ध

गैरअर्जदार : ग्रामसेवक वाजेगाव ता.जि.नांदेड

जाहिर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार शेख गौस पि.शेख महेबुब वय ४२ वर्ष, रा. वाजेगाव मो.क्र.८८०५१२५४१३ नांदेड ता.जि.नांदेड शेख गौस पि.शेख महेबूब जन्म दिनांक स्वत: १८-०३-२००७ रोजी राहत्या घरी येथे झाला असता अर्जदाराने जन्म प्रमाणपत्र रजिस्टर मध्ये नोंद होउन जन्म प्रमाणपत्र मिळण्याकामी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

तरी अर्जदारानी मागणी केले प्रमाणे संबंधीताचे नावे जन्म प्रमाणपत्र देण्या बाबत कुणाचा आक्षेप असेल तर त्यांनी दिनांक १०/१२/२०२६ पर्यंत प्रत्यक्ष किंवा वकीला मार्फत अगर आपल्या प्रतिनिधी मार्फत या न्यायालयात सकाळी ११.०० वाजता आपली बाजू मांडावी मुदतीत तशी तक्रार कोणाकडून न आलेस अर्जदार मागणी केल्या प्रमाणे त्यांना जन्म प्रमाणपत्र देण्याचा आदेश पारित करण्यात येईल.

सदरचे जाहीर प्रगटन आज दिनांक ३०.१०.२०२६ रोजी या न्यायालयाच्या सही व शिक्यानिशी देण्यात आले.

स्वाक्षरित/-
कनिष्ठ लिपीक
६ वे न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, नांदेड

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
सहाय्यक अधिक्षक
मुख्य न्यायदंडाधिकारी,नांदेड

नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.१६१४/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.२७/१०/२०२६

जाहीर सुचना

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **शाहीन बेगम मोहमद इब्राहीम** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **-- गट क्र.-- प्लॉट क्र.--** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **मोहम्मद इब्राहीम अब्दुल सत्तार** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- शपथपत्र/संमतीपत्र, २) बक्षीस पत्र :- ३) वारसा हक्क :- ४) वाटणी पत्र :- ५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील -- नगर/गल्ली मधील असून त्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- अब्दुल हबीब खती यांचे घर, पश्चिमेस :- अब्दुल जावीद यांचे घर, उत्तरेस :- रस्ता, दक्षिणेस :- अब्दुल वाहेद खतिब यांचे घर

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
मुख्याधिकारी
नगर पंचायत,अर्धापूर

नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.१६८०/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.०२/११/२०२६

जाहीर सुचना

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **मोहम्मद काजीम खतीब बशीर अहेमद** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **५१०/२२ गट क्र.५१० प्लॉट क्र.२२** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **रफियोद्दीन पि.काजी नसीरोद्दीन** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- ५१०/२०२६ दि.१७.३.२०२६, २) बक्षीस पत्र :- ३) वारसा हक्क :- ४) वाटणी पत्र :- ५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील -- नगर/गल्ली मधील असून त्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- ९ मिटर रुंद रस्ता, पश्चिमेस :- प्लॉट क्र.३७, उत्तरेस :- प्लॉट क्र.२३, दक्षिणेस :- प्लॉट क्र.२१

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
मुख्याधिकारी
नगर पंचायत,अर्धापूर

नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.१६७९/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.०२/११/२०२६

जाहीर सुचना

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **शरद मुरलीधरजी चरखा** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **१७९/४८ गट क्र.१७९ प्लॉट क्र.४८** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **स्वामी समर्थ इस्टेटसचे भागीदार** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- ३४६४/२०२४, २) बक्षीस पत्र :- ३) वारसा हक्क :- ४) वाटणी पत्र :- ५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील -- नगर/गल्ली मधील असून त्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- ९ मिटर रुंद रोड, पश्चिमेस :- प्लॉट क्र.१०, उत्तरेस :- प्लॉट क्र.४७, दक्षिणेस :- प्लॉट क्र.४९

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
मुख्याधिकारी
नगर पंचायत,अर्धापूर

नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.१६७७/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.०२/११/२०२६

जाहीर सुचना

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **इरफाना बेगम अब्दुल बारी** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **५६६ गट क्र.५६६ प्लॉट क्र.४७** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **परवीन अंजुम शाकेर मौला** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- ८३०२/२०२६ दि.२०.८.२०२६, २) बक्षीस पत्र :- ३) वारसा हक्क :- ४) वाटणी पत्र :- ५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील -- नगर/गल्ली मधील असून त्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- प्लॉट नं.४६ आहे, पश्चिमेस :- प्लॉट नं.४७ चा भाग आहे, उत्तरेस :- कुर्तडीकर यांचे घर आहे, दक्षिणेस :- रस्ता आहे.

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
मुख्याधिकारी
नगर पंचायत,अर्धापूर

जिल्ह्यातील चार गोशाळांची क्षेत्रीय पाहणी

नांदेड/प्रतिनिधी-जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता, साठवणूक आणि शास्त्रीय संगोपन व्यवस्थेचा आढावा घेण्यासाठी पशुसंवर्धन विभागाच्या वतीने मंगळवारी चार गोशाळांना क्षेत्रीय भेट देऊन पाहणी करण्यात आली.

जिल्हा उपआयुक्त, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. सखाराम खुणे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने मुदखेड तालुक्यातील कोल्हा येथील श्री गोवर्धन गोसेवा प्रकल्प, धर्माबाद येथील श्री पंच कमेटी गोरक्षण संस्था व श्री सिद्धेश्वर गोवत्स गोशाळा तसेच हिमायतनगर तालुक्यातील पवना येथील देवकृपा गोशाळा तथा गोविज्ञान केंद्राची पाहणी केली. यावेळी पशुधनाचे आरोग्य, संगोपन, हिरवा व वाळलेला चारा, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता आणि चारा साठवणूक व्यवस्थेचा आढावा घेण्यात आला. पाहण ेदरम्यान धर्माबाद येथील श्री पंच कमेटी गोरक्षण संस्थेकडे पुढील सुमारे आठ महिने पुरेल इतका वाळलेला चारा उपलब्ध असल्याचे आढळले. श्री सिद्धेश्वर गोवत्स गोशाळेत कडबा व भाताच्या तणसाचा साठा तसेच गोमयापासून गोकाष्ठ निर्मितीचा उपक्रम सुरू असल्याचे निदर्शनास आले. पवना येथील देवकृपा गोशाळेत हिरव्या मक्यापासून ५० टन आणि ऊसापासून १० टन, असा एकूण ६० टन मुरघास तयार करून साठविण्यात आला आहे.

गोकुंद्यातील अनाधिकृत गतिरोधकांवर अखेर जेसीबीचा घाव

नागरिकांच्या संतापाची प्रशासनाकडून दखल;मुख्य मार्ग झाला गतिरोधकमुक्त



किनवट/प्रतिनिधी-गोकुंदा शहरातील स्व.बाळासाहेब ठाकरे चौकापासून दत्तनगर मार्गे मंगाबोडी जाणाऱ्या मुख्य मार्गावर अनेकांनी मनमर्जीप्रमाणे आपापल्या घरासमोर तयार केलेल्या जीवघेणी गतीरोधकांवर जिल्हा परिषदेच्या स्थानिक बांधकाम प्रशासनाने अखेर तमाम नागरिकांच्या भावना लक्षात घेऊन २ नोव्हेंबर रोजी जेसीबी चालऊन समूळ उच्चाटन केले.

या कारवाईमुळे गोकुंदावाशियांनी एकदाचा सुटकेचा निःश्वास टाकून या कारवाईचे स्वागत केले. यापुढे या सार्वजनिक रस्त्यावर गतीरोधक तयार करून लोकप्रवासाला बाधा पोहोचविण्याचा प्रयत्न केल्यास रस्त्यापर्यंत केलेल्या अवैध बांधकामाविरुद्ध लोकांना रस्त्यावर उतरावे लागेल असा इशारा अनेकांनी दिलाय. राष्ट्रीय महामार्गावरील गोकुंदा येथील स्व.बाळासाहेब ठाकरे चौकापासून दत्तनगर चौकापर्यंत बहूतांश घरांच्या समोर सार्वजनिक मुख्य एकमेव असलेल्या प्रमुख रस्त्यांवर दोन दोन जीवघेणी गतीरोधकँ तयार करून सार्वजनिक लोकप्रवासाला बाधा पोहोचविण्याचे काम केले होते. अनेकांचे अपघात होऊन दुखापती सहन कराव्या लागल्यात. वयोवृद्ध महिला-पुरुष, दिव्यांगांना, गरोदरमातांसह अनेकांना या गतीरोधकांच्या त्रासाला सामोरे जावे लागले. तमाम नागरिक वैतागले होते. लोकभावना लक्षात घेऊन दैनिक नांदेड वार्ता, दैनिक लोकमंथन, सायं.दैनिक बीड वास्तवसह अन्य वृत्तपत्रांनी आवाज बुलंद केल्यामुळे स्थानिक जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग किनवटचे उपविभागीय अभियंता शिवाजी वारकड आणि शाखा अभियंता एस. बी. चाटोरीकरांनी गंभीर दखल घेऊन २ नोव्हेंबर रोजी गतीरोधकावर जेसीबी चालऊन सार्वजनिक मार्ग गतीरोधकमुक्त केलाय. गोकुंद्रा ते मंगाबोडी जाणारा प्रमुख मार्ग आहे. तर गोकुंद्रा ते किनवट जाणारा पर्यायी, एकमेव प्रमुख मार्ग आहे. या मार्गाच्या काठापर्यंत टोलेजंग इमारती उभारल्या आहेत. बांधकाम परवाना असेलच असे वाटत नाही. परवानगी असेल तर त्याचे निश्चितच कांहींनी उल्लंघन केले असेल असे रोडपर्यंत केलेल्या बांधकामावरुन स्पष्ट दिसते. त्यामुळे रस्त्याची रुंदी कमी झाली. त्यात अधिकची भर म्हणून सार्वजनिक रस्त्यावर वाहाने उभी करून सार्वजनिक वाहतूकीला अडथळा निर्माण करतात. कशाचीही पर्वा न करता अनेकांनी सार्वजनिक रस्त्या हा वैयक्तिक मालकीचा समजून पावलोपावली गतीरोधकँ तयार केली होती. अखेर लोकांच्या सहनशीलतेचा बांध फुटला. त्याची प्रसार माध्यमांनी दखल घेतली. जिल्हा परिषद बांधकाम विभागानेही लोकभावनांची कदर करुन गतीरोधकांचे उच्चाटन करून सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सुरळीत केली हे विशेष.

हाणेगाव-मरखेल येथील शासकीय रुग्णालयांचा कारभार रामभरोसे

आरोग्यमंत्र्यांनी अचानक तपासणी करण्याची नागरिकांची मागणी

देगलूर/प्रतिनिधी-देगलूर तालुक्यातील हाणेगाव व मरखेल येथील शासकीय रुग्णालयांचा कारभाराबाबत नागरिकांमधून नाराजी व्यक्त केली जात आहे. रुग्णालयात कर्मचारी नियमित उपस्थित राहत नसल्याच्या तसेच वरिष्ठ अधिकारी वेळेवर भेट देत नसल्याच्या तक्रारी नागरिकांकडून केल्या जात आहेत. त्यामुळे उपचारासाठी येणाऱ्या सर्वसामान्य रुग्णांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

हाणेगाव येथील शासकीय रुग्णालयात डॉ.पाटील हे बऱ्याच दिवसांपासून कार्यरत असून, त्यांच्या कामकाजा बाबतही नागरिकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत. रुग्णालयातील आरोग्यसेवा अधिक सक्षम करण्यासाठी योग्य प्रशासकीय नियोजन व जबाबदार अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याची मागणी होत आहे. रुग्णालयातील स्वच्छतागृहांची अवस्था अत्यंत खराब असल्याची तक्रारही नागरिकांनी केली आहे. स्वच्छतागृहांची नियमित स्वच्छता केली जात नसल्याने रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागतो. तसेच पाण्याची योग्य व्यवस्था नसल्याने स्वच्छतागृहांमध्ये पाणी उपलब्ध राहत नाही.डॉक्टर व संबंधित कर्मचाऱ्यांकडून या सुविधांकडे पुरेसे लक्ष दिले जात नसल्याने रुग्णालयातील स्वच्छता व्यवस्थेचा बोजवारा उडाला आहे. स्वच्छ पाणी, नियमित साफसफाई आणि मूलभूत सुविधा तातडीने उपलब्ध करून देण्याची मागणी नागरिकांनी केली आहे. मरखेल येथील शासकीय रुग्णालयाची परिस्थितीही याच स्वरूपाची असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीबाबत स्पष्टता नसल्याने रुग्णांना वेळेवर उपचार मिळण्यात अडचणी येत आहेत. वरिष्ठ अधिकाऱ्यांना भेटण्यासाठीही नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत असल्याची तक्रार आहे.दरम्यान, राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर हे नांदेड जिल्ह्यातील शासकीय आरोग्य संस्थांची पाहणी करणार असल्याच्या पार्श्वभूमीवर हाणेगाव व मरखेल येथील दवाखान्यांनाही त्यांनी अचानक भेट द्यावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

विश्वंभर पवार यांची आरोग्यमंत्र्याकडे मागणी

विस्कळीत आरोग्य सेवेबाबत कठोर कारवाई करावी


भोकर/प्रतिनिधी-जिल्ह्यातील ग्रामीण आरोग्य व्यवस्थेबाबत अनेक ठिकाणी गंभीर स्वरूपाच्या तक्रारी येत असून भोकर तालुक्यातील मातुळ प्राथमिक आरोग्य केंद्राच्या बांधकामाचा निकृष्ट दर्जा निवासस्थानाची अवस्था अशा संपूर्ण जिल्हाभर तक्रारी असून या सर्व प्रकरणाची चौकशी करण्यात यावी अशा मागणीचे निवेदन इंजि. विश्वंभर पवार यांनी राज्याचे आरोग्य मंत्री प्रकाश आबीटकर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

जिल्ह्यात अनेक ठिकाणी डॉक्टर व आरोग्य कर्मचारी वेळेवर हजर राहत नाहीत रुग्णांना औषध गोळ्या मिळत नाहीत परिणामी खाजगी दवाखान्याचा आधार घ्यावा लागत आहे. रेबीज प्रतिबंधक लस उपलब्ध नाहीत बांधकाम अनेक ठिकाणी निकृष्ट दर्जाचे झाले आहे सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र उपकेंद्रांची विशेष तपासणी पथकाद्वारे चौकशी करावी, बायोमेट्रिक उपस्थिती लागू करावी, औषधाचा साठा उपलब्ध करून द्यावा, निष्काळजी करणाऱ्या अधिकारी



व कर्मचाऱ्यांवर कार्यवाही करावी, वापराविना निवासस्थाने का आहेत त्याची चौकशी करावी, प्रत्यक्ष कामाचे मोजमाप, कंत्राटदार, झालेला खर्च, अभियंत्याची भूमिका तपासणी करावी अशा विविध मागण्यांचे निवेदन इंजि. विश्वंभर पवार यांनी आरोग्यमंत्र्याकडे दिले आहे.

ढाणकीत इसापूरच्या लिकेजवरुन शांतता भंग करण्याचा डाव?



उमरखेड/प्रतिनिधी-इसापूर धरणाच्या कालव्याला सध्या कोणतेही अधिकृत आवर्तन सुरू नसताना, केवळ लिकेजच्या पाण्यावरून ढाणकीत खालच्या पातळीचे राजकारण सुरू असल्याचा प्रकार समोर आला आहे.

माहितीनुसार, कालव्याच्या गेटमधून होणाऱ्या लिकेजच्या पाण्याचा काही शेतकरी मोटारीने उपसा करत होते. त्यासाठी त्यांनी कालव्याजवळ छोटा कट्टा तयार केला होता. या किरकोळ बाबीचा विपर्यास करून पाणी जाणीवपूर्वक अडविल्याचा खोटा आरोप करत शेतकऱ्यांची दिशाभूल केली जात आहे. याहून गंभीर बाब म्हणजे, काही व्यक्तींनी जेसीबीच्या सहाय्याने ढाणकी मायनर क्र. १ च्या गेटला वाकविले आणि मूळ मायनरमध्ये अनधिकृत खोदकाम करून त्याचा आकार बदलल्याचा आरोप होत आहे. हा प्रकार शासकीय मालमत्तेच्या नुकसानीचा असून भविष्यातील पाणीपुरवठा धोक्यात येऊ शकतो. याबाबत प्रशासनाकडे निवेदन देण्यात आले आहे. नगरपंचायतीमधील अंतर्गत वादाचा वचपा काढण्यासाठी निष्पाप शेतकऱ्यांच्या पाणीप्रश्नाचा वापर करून गावाची शांतता भंग करण्याचा प्रयत्न होत असल्याने सुज्ञ नागरिकांतून संताप व्यक्त होत आहे. या प्रकरणी प्रत्यक्ष स्थळपाहणी करून लिकेजचा स्रोत, कट्टा, गेटची स्थिती आणि मायनरमधील खोदकामाची मोजणी करून दोषींवर कडक कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

> ढाणकी मायनर क्र. १ ला शेतकऱ्यांची मागणी नसल्याने मातीचा भराव होता. आता मागणी आल्याने भराव काढला आहे. करंजी-सावळेश्वर मायनरला रोटेशन सुरू असल्याने पुढील २-३ दिवसात ढाणकी मायनर १ ला पाणी सोडले जाईल. तक्रारीची चौकशी करून कारवाई केली जाईल.
> **- श्रीराम खोकले,**
> उप अभियंता,उर्ध्व पैनगंगा प्रकल्प क्र.१ उमरखेड.

शेख साजिद युसुफमिया यांची'आयडॉल शिक्षक'म्हणून निवड

कुंडलवाडी/प्रतिनिधी-महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी आयडॉल शिक्षक म्हणून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हरनाळी येथील मुख्याध्यापक तथा सहशिक्षक शेख साजिद युसुफमिया यांची निवड करण्यात आली आहे.



शिक्षण क्षेत्रात शिक्षकाची भूमिका केवळ विद्यार्थ्यांना ज्ञान देण्यापुरती मर्यादित नसून, विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास घडविणे, त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव देणे आणि त्यांना उज्ज्वल भविष्याची दिशा दाखविणे हीदेखील असते. अशा महत्त्वपूर्ण कार्यात शिक्षकांचे योगदान मोलाचे ठरते. या पार्श्वभूमीवर शेख साजिद युसुफमिया यांची आयडॉल शिक्षक म्हणून झालेली निवड ही निश्चितच अभिमानास्पद बाब आहे.शिक्षक म्हणजे भविष्य घडविणारा शिल्पकार या विचाराला साजेसे कार्य करणाऱ्या शिक्षकांचा गौरव होणे ही शिक्षण क्षेत्रासाठी प्रेरणादायी गोष्ट आहे. शेख साजिद युसुफमिया यांच्या या निवडीमुळे शिक्षकवर्गात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यांच्या या यशाबद्दल बिलोली गटसाधन केंद्राचे गटशिक्षणाधिकारी बी. एम. पाटील, केंद्रप्रमुख संभाजी स्वामी, जाधव, विषय तज्ञ गुणवंतराव हलगारे, सुरेश राठोड, ढाकणे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक शेख सलीम, सरपंच, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष यांच्यासह समस्त हरनाळी ग्रामस्थ, शिक्षक, शिक्षणप्रेमी आणि मित्र परिवाराकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. आयडॉल शिक्षक हा सन्मान त्यांच्या शैक्षणिक कार्याला नवी प्रेरणा देणारा ठरेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

पत्रकार सचिन मोरे यांच्या घराला शॉर्टसर्किटमुळे आग;लाखोंचे नुकसान

कंधार/प्रतिनिधी-मंगळवारी, दि.३ नोव्हेंबर रोजी कंधार शहरातील रंगारगल्ली येथे घडली. पत्रकार सचिन मोरे यांच्या घराला शॉर्टसर्किटमुळे आग लागून घरातील संसारोपयोगी साहित्य जळून खाक झाले. सुदैवाने घरातील सदस्य बाहेर असल्याने आणि परिसरातील नागरिकांनी वेळीच धाव घेतल्याने मोठी दुर्घटना टळली. या आगीमध्ये लाखो रुपयांचे नुकसान झाले.



पत्रकार सचिन मोरे व त्यांच्या पत्नी एका कार्यक्रमानिमित्त बाहेरगावी गेले होते, तर त्यांची दोन्ही मुले शाळेत होती. याचदरम्यान घरातून धूर आणि आगीच्या ज्वाळा बाहेर येत असल्याचे परिसरातील नागरिकांच्या निदर्शनास आले. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून तरुणांसह नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. बादल्या व उपलब्ध साधनांच्या मदतीने पाणी टाकून आग विझविण्याचे प्रयत्न सुरू केले. नागरिकांच्या सामूहिक प्रयत्नांमुळे सुमारे ८० टक्के आग आटोक्यात आणण्यात यश आले. मात्र, घरातील संसारोपयोगी साहित्याचे मोठे नुकसान झाले. घटनेची माहिती मिळताच आमदार प्रतापराव चिखलीकर यांनी अग्निशमन वाहन पाठविण्याच्या सूचना दिल्या. नगरपरिषदेचे मुख्याधिकारी संदीप भोळे यांनीही सहकार्य केले. उपनगराध्यक्ष मन्नान चौधरी, माजी उपनगराध्यक्ष जाफरोद्दीन बहोद्दीन आणि नगरसेवक प्रतिनिधी शेख मजहर यांनी घटनास्थळी धाव घेऊन परिस्थितीची पाहणी केली. नागरिकांच्या प्रसंगावधानामुळे रंगार गल्लीतील मोठा अनर्थ टळला. मात्र, या घटनेने कँधार शहराच्या अग्निसुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आणला असून, भविष्यात एखादी मोठी दुर्घटना घडण्यापूर्वी नगरपरिषद प्रशासन जागे होणार का, हा प्रश्न उपस्थित झाला आहे. कंधार नगरपरिषदेचे स्वतःचे अग्निशमन वाहन गेल्या पाच वर्षांपासून बंद अवस्थेत असल्याची गंभीर बाब या घटनेच्या निमित्ताने पुन्हा समोर आली आहे.



नांदेड शहरातील वाहतूक समस्येमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. बुधवारी अण्णाभाऊ साठे चौकात वाहतूक कोंडी झाल्याने रुग्ण वाहिकेला काही काळ थांबावे लागले होते.

पान १ वरुन

मराठवाड्यातील...

मोर्चांवर होत असलेल्या टीकेलाही फडणवीस यांनी प्रत्युत्तर दिले. हे मोर्चे संविधानाच्या रक्षणासाठी आणि अराजकतेविरोधात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. विरोधकांप्रमाणेच सत्ताधारी पक्षालाही मोठ्या जनसमर्थनासह रस्त्यावर उतरण्याचा अधिकार असल्याचे सांगत त्यांनी विरोधकांवर निशाणा साधला.

पान १ वरुन

दुष्काळग्रस्त भूमिहीन...

असून मजुरांच्या हाताला काम उरलेले नाही. परिणामी अनेक कुटुंबांच्या उत्पन्नाचे मुख्य स्रोत पूर्णपणे आटले आहेत. अशा बिकट परिस्थितीत केवळ जमीनधारक शेतकऱ्यांना मदत देऊन भूमिहीन शेतमजुरांच्या श्रमाच्या आणि रोजगाराच्या नुकसानीकडे दुर्लक्ष करणे हा गंभीर सामाजिक व आर्थिक अन्याय आहे. ज्यांच्या श्रमावर शेतीचे उत्पादन उभे राहते, त्यांनाच दुष्काळाच्या मदतीतून वगळण्याचे धोरण आता खपवून घेतले जाणार नाही, असा ठाम इशारा या मोर्चातून प्रशासनाला देण्यात आला. या मोर्चाचे नेतृत्व महाराष्ट्र शेतमजूर व इतर ग्रामीण मजूर युनियन (लाल बावटा) चे राज्य सहसचिव कॉ. विनोद गोविंदवार, जिल्हाध्यक्ष कॉ.अंकुश अंबुलगेकर, जिल्हासचिव कॉ.माधव देशटवाड यांनी केले. यावेळी कॉ. रुक्मिनताई घुळेकर, कॉ. माणिक गोनशेटवाड, कॉ. विश्वनाथ वाघमारे, कॉ. सरुबाई सुरवसे, कॉ. पंचफुला पोतलवाड, कॉ. शहादत धुंदी, कॉ. महादेवी राजुरे, कॉ. गंगाधर वाघमारे, कॉ. विजुताई वायवळे, कॉ. देवानंद कुंचलवार, कॉ. विलास शिवपूजे यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते, शेतकरी व शेतमजूर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मनपा कंत्राटी...

या मागण्यांची पूर्तता न झाल्यास ६ नोव्हेंबरपासून महापालिका कार्यालयासमोर बेमुदत आंदोलन सुरू करण्यात येईल. या आंदोलनाची सर्वस्वी जबाबदारी महापालिका प्रशासनाची राहील, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. या निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी, सहाय्यक कामगार आयुक्त, वजिराबाद पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक तसेच अमृत इंटरप्रायजेसचे मालक व व्यवस्थापक यांना पाठविण्यात आल्या आहेत.

आरोग्य सेवेत हलगर्जीपणा.

अधिकारी-कर्मचाऱ्यांसह पर्यवेक्षकीय अधिकाऱ्यांवरही कठोर प्रशासकीय कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा डॉ. केंदवाड यांनी दिला. नागरिकांना दर्जेदार, तत्पर, पारदर्शक व सुलभ आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे हेच आरोग्य विभागाचे सर्वोच्च प्राधान्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४